**महाराष्ट्र शासन**
कृषि विभाग
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प
३० अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई ४०० ००५

दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३३५१/५२ ई-मेल : pmu@mahapocra.gov.in

जा.क्र.NDKSP-२२०१९(२१)/१/२०२६-DBT दि. १६/०२/२०२६

प्रति,

१.विभागीय कृषी सहसंचालक, (प्रकल्पांतर्गत सर्व)

२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, (प्रकल्पांतर्गत सर्व)

विषय:- नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा २ अंतर्गत शेळीपालन या घटकाबाबत...

संदर्भ:-१. प्रस्तुत कार्यालयाचे पत्र क्र. NDKSP-२२०१९(२२)/२/२०२५-DBT/I/१८०७५९४, दि.२८.१०.२०२५

२.जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,यवतमाळ यांचे कार्यालयाचे पत्र क्र. जिअकृअ/११४ २०२५, दि.०९.०१.२०२६

३. ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन,मर्झबान रोड,फोर्ट मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.आरटीएस-२०१८/प्र.क्र.१४५/आस्था.५ दि.१३.०२.२०१९

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा २ अंतर्गत प्रकल्प क्षेत्रामध्ये शेळी पालनाद्वारे भूमिहीन कुटुंबातील लाभार्थ्यांना पूरक उत्पन्न मिळवून देण्यासाठी तसेच ग्रामीण भागात रोजगार निर्मिती होण्याच्या दृष्टीने “शेळीपालन ” या घटकाचा समावेश करण्यात आलेला आहे. प्रकल्पात समावेश करण्यात आलेल्या गावांतील भूमिहीन कुटुंबातील व्यक्ती, विधवा, परितक्त्या व घटस्फोटीत महिलांना लाभ देणेबाबत कार्यवाही करणेबाबतच्या मार्गदर्शक सूचना संदर्भीय पत्र क्र.१ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,यवतमाळ यांचे कार्यालयाकडील संदर्भीय पत्र क्र.२ अन्वये त्यांनी सदर घटकाकरिता अर्जदारांकडून सादर करण्यात येणारे तहसीलदार यांचेकडील भूमीहीन प्रमाणपत्र हे कुटुंबाऐवजी वैयक्तिक व्यक्तीच्या नावे दिले जात असून सदर प्रमाणपत्र फक्त संबंधित गावाच्या हद्दीपर्यंत मर्यादित असल्याने,शेळीपालन या घटकासाठी भूमीहीन कुटुंब पात्रतेबाबत/प्रमाणपत्राबाबत मार्गदर्शन मिळणेबाबत प्रकल्प कार्यालयास कळविले आहे.

त्या अनुषंगाने शेळीपालन या घटकासाठी ज्या अर्जदारांनी ते स्वतः भूमिहीन असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करून अर्ज केलेले आहेत, असे सर्व अर्ज पूर्वसंमती न देता अर्जदारांच्या स्तरावर परत करण्यात यावेत. तसेच भूमीहीन कुटुंबाच्या अनुषंगाने पात्रतेबाबतच्या सूचना यथावकाश निर्गमित करण्यात येतील.

घटस्फोटीत महिलांच्या बाबतीत अर्ज करताना अर्जदारांनी मा.न्यायालयाचे आदेश अर्जासोबत सादर करावे. विधवा व परितक्त्या महिलांच्या बाबतीत संदर्भीय क्र.३ च्या शासन निर्णयान्वये विधवा असल्याच्या दाखल्यासाठी नवऱ्याच्या मृत्यु नोंद दाखल्यासोबत पुनर्विवाह न केल्याचे स्वयंघोषणापत्र घेण्यात यावे. तसेच परितक्त्या असल्याच्या दाखल्यासाठी मा.न्यायालयाने अथवा सक्षम प्राधिकाऱ्याच्या आदेशासोबत नवऱ्याने

सोडल्याचे/नवऱ्यास सोडल्याचे स्वयंघोषणापत्र घेण्यात यावे. स्वयंघोषणापत्राचा नमुना सहपत्रीत करण्यात येत आहे. तरी उक्त सूचना विचारात घेऊन त्या अनुषंगाने क्षेत्रीय स्तरावर कार्यवाही करण्यात यावी.

सोबत-वरीलप्रमाणे .

प्रकल्प संचालक
नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प, मुंबई

प्रती-उपविभागीय कृषी अधिकारी (प्रकल्पांतर्गत सर्व) यांना पुढील कार्यवाहीस्तव.

अर्जदाराचा फोटो

## विधवा महिलांकरिता स्वयंघोषणापत्र

मी ------------------------------------------ आधार क्र.---------------------------------वय ------वर्षे, व्यवसाय------------------------राहणार-----------------------------------याद्वारे घोषित करते की, माझे पती ---------------------------------------यांचे दि.------------रोजी निधन झालेले असून त्यांच्या मृत्युचा दाखला सोबत जोडत आहे. तसेच मी पुनर्विवाह केलेला नाही.

मी याद्वारे घोषित करते की, वरील सर्व माहिती माझ्या व्यक्तिगत माहिती व समजूतीनुसार खरी आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता अन्वये आणि/किंवा संबंधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन. तसेच सदर स्वयंघोषणापत्राद्वारे मला मिळालेले सर्व लाभ सर्वकषरित्या काढून घेण्यात येतील,याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण : ------------------------ अर्जदाराची सही :------------------------

दिनांक: ------------------------ अर्जदाराचे नांव :------------------------

अर्जदाराचा फोटो

## परितक्त्या महिलांकरिता स्वयंघोषणापत्र

मी ------------------------------------------- आधार क्र.----------------------------------
वय --------वर्षे, व्यवसाय------------------------राहणार------------------------------------याद्वारे घोषित करते की, माझे पती----------------------------------------यांचेपासून मी विभक्त झालेले असून याबाबत मा.न्यायालय अथवा सक्षम प्राधिकारी यांचेकडील आदेश सोबत जोडत आहे.

मी याद्वारे घोषित करते की, वरील सर्व माहिती माझ्या व्यक्तिगत माहिती व समजूतीनुसार खरी आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता अन्वये आणि/किंवा संबंधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन. तसेच सदर स्वयंघोषणापत्राद्वारे मला मिळालेले सर्व लाभ सर्वकषरित्या काढून घेण्यात येतील,याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण : ------------------------ अर्जदाराची सही :------------------------

दिनांक: ------------------------ अर्जदाराचे नांव :------------------------

Digitally signed by
PARIMAL SINGH
Date: 16-02-2026
14:30:52